कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे करिता वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४० /भाग -१/ कोषा-प्रशा-४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ जुलै, २०१८.

**वाचा :** (१) शासन निर्णय क्रमांक:संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४ कोषा.प्रशा-४, दि.०९ जूलै,२०१४.
(२) शासन निर्णय,क्रमांक:संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४ कोषा.प्रशा-४,दि.२५ जून,२०१५.
(३) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४, कोषा प्रशा-४, दि.२८.०६.२०१६.
(४) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/२०१४, कोषा प्रशा-४, दि.१७.०७.२०१७

**प्रस्तावना-**

वरील संदर्भ क्रमांक १ ते ४ च्या शासन निर्णयान्वये शासकीय सेवेच्या अंतिम वर्षात पदार्पित शासकीय अधिकारी/कर्मचारी, व नुकतेच सेवानिवृत्त झालेले शासकीय अधिकारी/कर्मचारी व कुटूंब निवृत्तीधारक यांच्यासाठी वैद्यकीय गट विमा योजना लागू करण्यात आली होती. आता दि.०१.०७.२०१८ ते ३०.०६.२०१९ या वर्षाकरिता सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. शासकीय सेवेच्या अंतिम वर्षात पदार्पित शासकीय अधिकारी/कर्मचारी, व नुकतेच सेवानिवृत्त झालेले शासकीय अधिकारी/कर्मचारी व कुटूंब निवृत्तीधारक यांच्यासाठी वैद्यकीय गट विमा योजना वरील क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार लागु करण्यात आली होती. ही योजना गटविमा तत्वावर आहे. सदर योजना दिनांक ०१.०७.२०१८ ते ३०.०६.२०१९ या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व गट अ, ब, क व ड अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना सक्तीची राहील, असे योजनेचे स्वरूप आहे. शासकीय सेवेत कार्यरत इतर कोणताही अधिकारी/कर्मचारी स्वेच्छेने या योजनेत आवश्यक तो वार्षिक हप्ता भरुन सहभागी होवू शकेल. तसेच दि.३०.०६.२०११ नंतर सेवानिवृत्त झालेला कोणताही अधिकारी/कर्मचारी स्वेच्छेने या योजनेत आवश्यक तो वार्षिक विमा हप्ता भरुन सहभागी होवू शकेल. तथापि ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी यापूर्वी अशा प्रकारची वैद्यकीय विमा पॉलिसी धारण केली आहे, त्यांचेबाबतीत विमा पॉलिसी ग्राह्य धरून संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्याने खात्री करून प्रस्तुत विमाछत्र योजनेतून त्यांना वगळण्यात यावे.

# शासन निर्णय

१ शासन असे आदेश देत आहे की, दि.०१.०७.२०१८ ते दि. ३०.०६.२०१९ या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच इतर कंपन्यांकडून वैद्यकिय विमा पॉलिसी धारण केलेली आहे, त्यांना दि.०९.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील योजना सक्तीची राहणार नाही, याविषयी संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री करून सुट द्यावी.

२. सन २०१७-१८ मध्ये जमा झालेल्या एकुण प्रिमियम रक्कम रूपये २०.१५ कोटी च्या तुलनेत रूपये १९.२० कोटींचे दावे मंजूर करण्यात आले आहेत. तसेच अद्याप पॉलिसीची मुदत दिनांक २५/०७/२०१८ पर्यंत शिल्लक असल्याने, सदर कालावधीत उद्भवणा-या दाव्यांची संख्या विचारात घेता incurred claim ratio १२०% च्या वर होणार आहे. त्यामुळे दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीने सन २०१८-१९ करिताचे दरात वाढ प्रस्तावित करून सुधारीत प्रिमियम दर खालीलप्रमाणे दिला आहे. तसेच सदर दरात १८% GST समावेश आहे.

| विमा छत्र रक्कम (पती+पत्नीकरिता) | सन २०१७-१८ मधील विमा हप्ता (जीएसटी वगळून) | सन २०१७-१८ मधील विमा हप्ता १८% जीएसटीसह | सन २०१८ -१९ मधील विमा हप्ता जीएसटी वगळुन | एकूण विमा हप्ता (१८% जीएसटीसह) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| रू. १ लाख | रू.९३२८/- | रू.११००७/- | रू.९३२८/- | रू.११००७/- |
| रू. २ लाख | रू.१०६४५/- | रू.१२५६१/- | रू.११८४९/- | रू.१३९८२/- |
| रू. ३ लाख | रू. ११९६१/- | रू.१४११४/- | रू.१५३४१/- | रू.१८१०२/- |
| रू. ४ लाख | रू.१३१३२/- | रू.१५४९६/- | रू.१५३४१/- | रू.१८१०२/- |
| रू. ५ लाख | रू.१४३०२/- | रू.१६८७७/- | रू. १८४८७/- | रू.२१८१५/- |
| रू. ८ लाख | रू.१७८१३/- | रू.२१०२०/- | वगळण्यात येत आहे | |
| रू. ९ लाख | रू.१८९८४/- | रू.२२४०१/- | वगळण्यात येत आहे | |
| रू.१० लाख | रू.२०३०१/- | रू.२३९५५/- | रू.३३५६९/- | रू.३९६११/- |
| रू.२० लाख | रू.३०९८०/- | रू.३६५५७/- | रू.६४२५९/- | रू.७५८२६/- |

३. संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयातील अनुक्रमांक ४, ५, ६, ८, ९ व १० येथील अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच कायम राहतील.

४. संदर्भाधिन क्र. ४ येथील शासन निर्णयामधील अ.क्र.७ वगळण्यात येत आहे.

५. जेथे PPN हॉस्पीटल उपलब्ध आहेत, अशा क्षेत्रामध्ये केवळ PPN पॅकेजेस प्रतिपूर्तीसाठी ग्राहय धरली जातील.

**स्पष्टीकरण:-** अ) विमा धारकास कोणत्याही PPN हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्याची मुभा असेल तथापि प्रतिपूर्ती ही विमा कंपनीच्या PPN पॅकेजेसच्या दराप्रमाणे दिली जाईल. हॉस्पिटलचे दर व PPN दर यातील फरक विमा धारकाने सोसावयाचा आहे.

ब) PPN बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्याचे स्वातंत्र्य विमा धारकास असेल, तथापि अशा प्रकरणी विमा कंपनीच्या प्रचलित धोरणानुसार हॉस्पिटलची अर्हता तपासून कंपनी दावा पारित करेल.

६. या शासन निर्णयान्वये यापूर्वीची विमाछत्र योजनेतील रु.८ लाख व रु.९ लाख रकमेची विमा मर्यादा (slab) वगळण्यात येत आहे.

७. विमाछत्र रक्कम रु.१० लाख व रु.२० लाख मधील विमाधारकांना रुम रेंटमध्ये कॅपींग (Capping) खालीलप्रमाणे असेल.

विमाछत्र रक्कम रु.१० लाख - आश्वासित रकमेच्या १% व कमाल रु.८,०००/- च्या मर्यादेत सर्वसाधारण वास्तव्याकरिता
- आश्वासित रकमेच्या २% व कमाल रु.१६,०००/- च्या मर्यादेमध्ये अतिदक्षता रुममधील वास्तव्याकरिता

विमाछत्र रक्कम रु.२० लाख - आश्वासित रकमेच्या १% व कमाल रु.१५,०००/- च्या मर्यादेत सर्वसाधारण वास्तव्याकरिता
- आश्वासित रकमेच्या २% व कमाल रु.३०,०००/- च्या मर्यादेमध्ये अतिदक्षता रुममधील वास्तव्याकरिता

८. सदर योजनेच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर सूचना संचालक (ले व को), मुंबई यांनी त्यांचे स्तरावर तात्काळ निर्गमित कराव्यात.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०७१६१३०३४८३१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2018.07.16 13:05:03 +05'30'

**(अनुदीप दिघे)**
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव.
२. मुख्यमंत्र्याचे व उप मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग ,
५. प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालय प्रमुख
६. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा), मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
११. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/औरंगाबाद

१३. सर्व विभागीय आयुक्त,

१४. सर्व जिल्हाधिकारी,

१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा

१६. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई

१७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई

१८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर

१९. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर

२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२१. संचालक, लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई

२३. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती

२४. सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती

२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे,

२७. निवड नस्ती/कार्यासन कोषा प्रशा-४.